## निशाणी क्र. २७, २८ व २९ चे अर्जावरील एकत्रीत आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ लक्ष्मण तुकाराम जाधव यांचे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर न घेतलेने झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता, वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करणेबाबत व प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरूस्ती दाव्यामध्ये करण्यास परनवागी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ हे दिनांक २७.०३.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादीचे वारस मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक आहेत. करिता, अबेटमेंट रद्द होवून, वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवून प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची व तशी दुरूस्ती दाव्यात करण्याबाबत परवानगी मिळण्याची वादी यांनी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी उपरोक्त अर्जांवर त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले की, वादी यांना प्रतिवादी क्र.४ हे मयत झाले असल्याचे माहित असताना देखील केवळ दाव्यास विलंब करण्याकरिता त्यांनी सदरील अर्ज विलंबाने दिलेले आहेत. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास दाव्यास अजुन विलंब होईल. करिता सदरील अर्ज रक्कम रूपये २०००/– च्या खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतचे अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ४ विचार करता जर प्रतिवादी याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांच्या विरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला टिकून राहिला तर प्रतिवादीच्या कायदेशीर वारसांना

पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीबाबत प्रतिवादीचे वारसांविरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला आहे असे दिसून येत आहे. सबब, झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब झालेचे दिसून येत आहे. यासर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

०२. वादी यांचेविरुध्द प्रतिवादी क्र.१ यांचा अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

०३. वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

०४. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी, तसेच दुरूस्त दाव्याची प्रत व आवश्यक प्रती तदनंतर तात्काळ सादर कराव्यात.

०५. वादी यांनी सदर अर्जांच्या खर्चाची एकत्रीत रक्कम रुपये ३००/– (रक्कम रुपये दोनशे फक्त) प्रतिवादी यांना द्यावी.

स्वाक्षरित/–

दिनांकः ०५.०७.२०२४. (श्रीमती आर. व्ही. पाटील)

भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०५.०७.२०२४.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही